# मा. मंत्री (वित्त) श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी शनिवार, दिनांक १८ मार्च २०१७ रोजी केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणाची ठळक वैशिष्ट्ये.

## भाग–१

- अर्थसंकल्पीय कामकाजाच्या कार्यपद्धतीत अमुलाग्र बदल. योजनेतर व योजनांतर्गत खर्चाचे एकत्रिकरण.
- समाजातील दुर्बल वंचित घटकास तसेच कृषी क्षेत्रास केंद्रस्थानी ठेऊन केलेला अर्थसंकल्प.
- जलसंपदा विभागास ८ हजार २३३ कोटी रुपये इतकी भरीव तरतूद.
- इस्त्रायली तंत्रज्ञानाचा वापर करुन यवतमाळ व वर्धा येथे सूक्ष्म सिंचनासाठी १०० कोटी रुपये.
- कृषी पंपाचा अनुशेष भरुन काढणे व पायाभूत आराखडा दोनच्या अंमलबजावणीसाठी ९७९ कोटी रुपये इतकी मोठी तरतूद.
- गटशेतीच्या माध्यमातून कृषी क्षेत्राची उत्पादकता वाढविण्याच्या पथदर्शी प्रकल्पासाठी २०० कोटी रुपये.
- मराठवाड्यातील ४ हजार गावे व विदर्भातील १ हजार गावे दुष्काळापासून संरक्षित करण्यासाठी जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्याने ४ हजार कोटी रुपयांचा नानाजी देशमूख कृषी संजीवनी प्रकल्प.
- शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी राज्यशासन प्रयत्नशील.
- प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास कार्यक्रमांतर्गत १ लाख २२ हजार युवकांना प्रशिक्षण.
- गवंडी कारागिरांना प्रशिक्षण देऊन १० हजार गवंडी कारागिरांना रोजगार.
- चंद्रपूर येथे सैनिकी शाळा सुरु करण्यासाठी २०० कोटी रुपये.
- रस्ते व बांधकाम सुधारणांसाठी ७ हजार कोटी रुपये.
- वाढवण, जि. पालघर येथे देशातील पहिले कॉर्पोरेट मेजर पोर्ट उभारणार.
- नियोजित सौर उर्जा प्रकल्पासाठी ५२५ कोटी रुपये.
- मागास भागात उद्योग उभारण्यास प्रोत्साहन देण्याच्या योजनेसाठी २ हजार ६५० कोटी रुपये.
- नागरी क्षेत्रात मूलभूत सेवांचा विकास करण्यासाठी १ हजार ८७० कोटी रुपये.
- नागरी भागात आरोग्य व पर्यावरण कार्यक्रम राबविण्यासाठी १ हजार ६०५ कोटी रुपये.
- अनुसूचित जातीच्या कल्याणकारी योजनांसाठी ७ हजार २३० कोटी रुपयांची तरतूद.
- अनुसूचित जमातीच्या कल्याणकारी कार्यक्रमांसाठी ६ हजार ७५४ कोटी रुपयांची तरतूद.

- वृद्ध, निराधार, विधवा यांना संजय गांधी योजनेअंतर्गत आर्थिक साहाय्य करण्यासाठी १ हजार ८८४ कोटी रुपये.
- अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ व इतर मागासवर्गीय विकास महामंडळ यांना प्रत्येकी २०० कोटी रुपयांचे तसेच शामराव पेजे कोकण कुणबी विकास महामंडळ यांना रुपये ५० कोटीचे आर्थिक सहाय्य.
- अंगणवाडीतील बालकांच्या पोषक आहार कार्यक्रमांसाठी ३१०.५७ कोटी रुपये.
- न्याययंत्रणेच्या सक्षमीकरणासाठी ६७९.५३ कोटी रुपये.
- पायाभूत सुविधांकरिता मोठ्या प्रमाणात भांडवल उभारणीसाठी "महाइन्फ्रा" या विशेष हेतुवहन यंत्रणेची स्थापना करणार.
- मराठवाड्यातील दुष्काळसदृश्य परिस्थितीवर मात करण्यासाठी मराठवाडा वॉटर ग्रीडची उभारणी करण्यात येणार आहे.
- महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानासाठी ११०० कोटी रुपये.
- स्मार्ट सिटी योजनेसाठी १६०० कोटी रुपये.
- अमृत योजनेसाठी १८७० कोटी रुपये.
- स्वच्छ भारत अभियानासाठी १६०५ कोटी रुपये.
- मुंबई, पुणे, नागपूर मेट्रोसाठी या वर्षाकरिता ७१० कोटी रुपये.
- औरंगाबाद येथील कर्करोग रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन त्याची राज्यस्तरीय कर्करोग संशोधन संस्था निर्माण करणार.
- विविध कर्करोगांच्या रोगनिदानासाठी २५३ आरोग्य संस्थांमध्ये स्क्रिनिंग मशीन बसवणार.
- निवडक ३१ रुग्णालयांमध्ये सिटी स्कॅन मशीन बसवणार.
- राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची व्याप्ती विस्तारुन महात्मा फुले जनआरोग्य योजना अंमलात आणणार.
- माकडताप रोगनिदान उपचार प्रशिक्षण व संशोधनासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्रयोगशाळा.
- मानव वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी चैन लिंक फेन्सिंग योजना.
- अल्पसंख्याक कल्याणासाठी ३३२ कोटी रुपये.
- महिला आयोगाच्या तरतुदीमध्ये भरीव वाढ.
- सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण.
- निर्मलवारीसाठी दरवर्षी ३ कोटींची मदत.
- नॅशनल स्कुल ऑफ ड्रामाच्या धर्तीवर महाराष्ट्र स्कुल ऑफ ड्रामा स्कुल सुरु करणार.

* * * * *